नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 15/02/2021 (सोमवार)
(दुपार)

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही – दिनांक 14/02/2021 चे 20.30 वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादी यांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक श्रीमती मंडावले या करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 10 कि मी अंतरावर मौजा धापेवाडा सावनेर येथे दिनांक 14/02/2021 चे 11.43 वा. पर्यंत फिर्यादी नामे– नंदकिशोर हेमराज पारसे, वय 21 वर्ष, रा. वार्ड क्र 1 धापेवाडा सावनेर यांचे मोबाइल वर अज्ञात आरोपीने फोन करुन सांगितले की "फोनची प्रोसिजर करा तेव्हा तुम्हाला 5,000/– रु. चा कैश बैक मिळणार" यावरून फिर्यादीने प्रोसिजर पूर्ण केल्यावर फिर्यादीच्या बैंक ऑफ इंडियाचे खात्यामधून आरोपीने ऑनलाईन पद्धतीने 77,700/–रु. काढुन घेत फिर्यादीची फसवणूक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66 (सी) आयटी अॅक्ट अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. कोळी 9657811111 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर